## महिन्याचा विचार

### भगवान श्रीकृष्णास प्रार्थना

कृष्णाय वासुदेवाय देवकी नन्दनायच ।
नन्द गोपकुमाराय गोविन्दाय नमोनम:।।

भगवान श्रीकृष्णाला, वासुदेवाच्या पुत्राला, देवकीच्या परमानंद दात्याला, नंदगोपाळांच्या लाडक्या सवंगड्याला, गाईंच्या पालनकर्त्याला, मी पुन: प्राणिपात करतो. हे कृष्णा आता तू माझा प्रिय सुहृद झाला आहेस. तुझ्या अंत:करणात माझ्या बद्दल एक जिव्हाळ्याची बाजू आहे. तर आता मला तुझ्या लीला आणि वेदांत यांचे मूळ उकलून समजाऊन दे. गीतेमध्ये तू म्हणतोस, ''मी वेदांताचा कर्ता आणि वेदाचा ज्ञाता आहे.'' तूच माझा सर्वात्तम गुरु आहेस. मला वेदांतातील कठिण प्रमेयांचे स्पष्टीकरण करून सांग.

त्याचे सोपे पाठ दे. शुक्रदेवांसारखा ब्रह्मज्ञानी आणि अद्वैत समाधिग्न असलेला, परीक्षिताला भागवत का सांगतोय?

सायुज्य अवस्थेतील आनंदाचे भक्तांचे अनुभव, असंप्रतात समाधीत असलेल्या योग्यांचे अनुभव, आणि अद्वैत अवस्थान रूप समाधीतील ज्ञानी पुरुषांचे अनुभवयांच्यात फरक कोणता आहे? जीवनमुक्त आणि विदेहमुक्ति, तुरीया आणि तुरीयातीत, क्षरपुरुष आणि अक्षरपुरुष, पुरुषोत्तम यांच्यातील नेमका फरक कोणता? कृष्णा तू माझ्या हृदयांतरी आहेस. माझ्या मनाचा साक्षी आहेस. माझ्या प्राणाच्या रक्षणकर्ता आहेस. मी तुझ्यापासून काही एक लपवून ठेवू शकत नाही. कारण माझ्या मनात उत्पन्न होणाऱ्या विचारांचा तू सर्वप्रथम साक्षी आहेस. तुझे भय वाटत नाही. तु आता माझा सखा आहेस. मला अर्जुना सारखेच मान. मी गाईन, नृत्य करीन, तू बांसरी वाजवू शकतोस. आपण मिळून लोणी-साखर खाऊ, गाऊ या. पण मला गीता सांग. पुन्हा एकदा तुझ्या मुखातून समक्ष मला ऐकू दे. आमच्या दृष्टी आड असलेल्या परब्रह्मा, वंदनीय परमात्मा, या अनंत विश्वातील अणुरेणूतून अपरिमित अवकाशापासून तो अगदी माझ्या पायाखालील गवताच्या पात्या तोतू भरून राहिला आहेस. सर्वनाम आणि रूपयांचे अधिष्टानतून आहेस. तसाच माझ्या दृष्टीचा आकर्षण बिंदू आहेस. माझ्या अंतरीचे प्रेम, प्राणाचा प्राण आत्म्याचे आत्मतत्व तूच आहेस. माझ्या बुद्धीला आणि इंद्रियांना प्रकाशाने उजळणारा तूच आहेस. तसाच तूच माझ्या हृदयातील मंद मधूर अनाहत नाद. माझ्या भौतिक मानसिक आणि कारणिक अशा आकारूपांचे मूळ अधिष्ठान तूच आहेस. या विश्वाचा सर्व समर्थ नियंता, माझ्या तीन्ही देहांचा अंतर्यामीचा नियंत्रक म्हणून मी केवळ तुलाच जाणतो. हे प्रभो, मी तुला पुन:पुन्हा दंडवत घालतो. तूच माझा एकमेव आधार आहेस. केवळ तुझ्यावरच माझी श्रद्धा आहे. हे दयासागरा, प्रेमस्वरूपा, मला उत्साहित कर. माझे प्रबोधन कर, मार्ग दाखीव, रक्षण कर. माझ्या आध्यात्मिक साधनेतील संकटे दूर कर. अज्ञानाचे पटल दूर सार.

हे जगन्नाथ, आता मी एक सेकंद सुद्धा या देहाच्या, जीवनाच्या आणि संसाराच्या यातना सहन करू शकत नाही. आता अगदी विलंब दर्शन दे. हे प्रभो, मी झुरून राहिलो आहे खंगतो आहे.

ऐक ऐक माझी तळमळीची प्रार्थना, माझ्या पालनकर्त्या, असा निष्ठुर होऊ नकोस.

तू दीन बंधू आहेस. अधमउद्धारक आहेस. पतितपावन आहेस. हे करूणासागरा, ज्ञान आणि दिव्य आनंदाच्या निर्झरा, तू माझ्या नयनांचे नयन, कानांचे कान आणि आमच्या सर्वमनांचे मन आहेस. आत्मांचे आत्मरूप आहेस. तुला आम्ही पाहू शकत नाही. पण तू सर्व पाहतोस. तुझे आम्ही ऐकू शकत नाही. पण तू सर्व ऐकतोस.

ज्याचा आम्ही विचार करू शकत नाही असा विचार दाता तू आहेस आणि जाणू शकत नाही असा जाणता तू आहेस. माझी पुन्हा विनवणी आहे. तू सर्व मोहापासून आम्हाला सांभाळ, ज्ञान अंतर शुद्धी आणि जाणिवेचे ज्ञान दे.

हे प्रभो, प्राणदात्या, विभोविश्वनाथा, आमची प्रार्थना ध्यानी मनी घे. सद्मा मार्ग दिसू दे.

संसाराच्या मायाजाळातून बाहेर काढ.

मला खडे मांडून शिकीव. आधार दे. तुझाच आम्ही गौरव करतो. तुझीच पूजा करतो. तसेच तुझेच ध्यान करतो. तुझे चरण हाच माझा एकमेव आसरा आहे.

श्री.भ.रा. नाईक

Three things are very difficult to obtain in this mortal world—birth as a human being, desire for liberation and association with the wise ones—and they are obtained only through the blessings and grace of God. Of the three, human birth is a very precious gift that has been put first and foremost. It is that state of existence where alone the Jiva (individual soul) becomes endowed with intellect and the extremely rare faculty of discrimination—Nitya-Anitya-Vastu-Viveka. Therefore, human birth is put down as a very rare gift of God. Having got a human birth, if you do not have a yearning to attain that state which will bestow upon you eternal bliss and immortality, it means thatyou do not utilise this human birth to any purpose at all. Then your existence becomes patterned as of the animals. Eating, drinking, sleeping and enjoyment of sensual pleasure are common to both man and animals, but that which distinguishes man is his idealism, his earnest desire for attaining something higher than mere material existence. We know that there is a higher thing to be attained and we have also a keen desire to become free from the imperfections of this physical life.

- Swami Chidananda



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

✼ **भावपूर्ण श्रद्धांजली –** आपल्या शाखेचे अध्यक्ष, स्वामी शिवानंद सरस्वती यांचे अनुग्रहित श्री.भ.रा.नाईक यांनी बुधवार दि. ३० जून रोजी सकाळी ११ वाजून ५ मिनिटांनी आपला देह ठेवला, मृत्यू समयी त्यांचे वय ९३ वर्षे होते. सदगुरूंचा कृपा हस्त त्यांच्यावर कायम राहील. यानिमित्ताने मागील अंकातील त्यांचा ''महिन्याचा विचार'' पुनर्मुद्रित करीत आहोत.

✼ जून महिन्याचा सत्संग दि. २० जून रोजी आभासी पद्धतीने झाला.

✼ ''दिव्य जीवन'' या आपल्या मासिकपत्रिकेचा जून महिन्याचा अंक सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी रूपात पाठविण्यात आला.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १६/अंक ७
जुलै २०२१

"An hour's service of the sick, with Divine Bhava is better than a year's pilgrimage to Tirthas"

~ Sri Swami Sivananda.

**JULY 1 - HAPPY DOCTORS' DAY**

"The Lord Himself is the first divine physician. He is the best among physicians.

When the body is afflicted with senility and diseases, the holy water of Mother Ganga is the medicine and Lord Narayan, from whose holy feet Ganga emanates, is the great physician."

**— Lord Dhanwantari.**